तरुण भारत
सांगली
www.tarunbharat.com
₹ ४.०० बुधवार दि. २४ सप्टेंबर २०१४ बेळगाव • गोवा


# मानवी अतिक्रमणामुळे पश्चिम घाटातील जैविविधता धोक्यात

## डॉ. बाचुळकर  किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टीवला उत्साहात प्रारंभ : नेर्लीकर, सुतारना पुरस्कार

प्रतिनिधी
सांगली

विकासाच्या नावाखाली जगभरातील बारा देशासह भारतातही पश्चिम घाटामध्ये मानवी अतिक्रमण मोठ्या प्रमाणात सुरू आहे.यामुळे या प्रदेशातील जैविविधता धोक्यात आली आहे.हे अतिक्रमण आणि जंगल तोड वाचविले पाहिजे. दुर्मीळ वनस्पती आणि जैविविधतेची आश्रयस्थाने टिकविण्याचीही गरज असून याबाबत संशोधन होण्याची गरज आहे. प्रतिपादन ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ आणि पेठवडगाव येथील विजयसिंह यादव आर्टस अॅन्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. मधुकर बाचुळकर यांनी येथे बोलताना केले. किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवलच्या उद्घाटनप्रसंगी पश्चिम घाट आणि पर्यावरण या विषयावर ते बोलत होते.

येथील रोटरी हॉलमध्ये २५ सप्टेंबरअखेर चालणाऱ्या फिल्म फेस्टीवलचे उद्घाटन त्यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. सांगली फिल्म सोसायटीचे अध्यक्ष अरूण दांडेकर हे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बाचुळकर म्हणाले, केंद्र सरकारने नेमलेल्या गाडगीळ व त्यानंतरच्या डॉ. कस्तुरीरंजन समितीने पश्चिम घाटाचा अभ्यास करून केंद्राला अहवाल सादर केला. डॉ. कस्तुरीरंजन यानी सॅटेलाईटवरून वनस्पतींचा अभ्यास केला.त्यावरून त्यांनी केवळ ३७ टक्के जंगल वाचविणे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद केले. केंद्राकडे हे दोन्हीही अहवाल दिले आहेत. त्यापैकी एक अहवाल केंद्राकडून स्वीकारला जाण्याची शक्यता आहे.

पश्चिम घाटाला युनोस्कोसचा राष्ट्रीय वारसा म्हणून आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. सहा राज्यापैकी ४६ टक्के भाग महाराष्ट्रात आहे. पश्चिम घाट हा जैविविधतेसाठी प्रसिध्द आहे. पण, विकासाच्या नावाखाली जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भारतात ८१ हजार प्रकारच्या प्राण्याच्या जाती आणि प्रजाती व ४८ हजार वनस्पतींचे प्रकार आहेत. जगात याबाबतीत आपला सातवा क्रमांक आहे. पण, देशातील ९५ टक्के लोकांना याबाबतची माहिती व जाणिव नाही. भारतात तर अशा पाच हजार वनस्पती आहेत. त्या जगाच्या पाठीवर कोठेही आढळत नाही. इशान्य भारताप्रमाणेच जम्मू- काश्मिर , हिमाचल, उत्तरांचल, अंदमान निकोबार आणि पश्चिम घाटातील जैविविधता वाचविण्याची आवश्यकता आहे. यावेळी छायाचित्रकार प्रदीप सुतार प्रतिबिंब संस्थेचे दिलीप नेर्लीकर यांना वसुंधरा मित्र पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले. वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक आणि दांडेकर यांनी स्वागत तर शुभदा पाटणकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी विजय शिंदे, पापा पाटील, महेश कराडकर, तानाजीराव मोरे, डॉ. शरद आपटे, प्रथमशेट्टी, विनायक केळकर आदी उपस्थित होते.

**शेतकरी संघटनेचे असेही प्रदर्शन**

दरम्यान, कार्यक्रमाच्या ठिकाणी अजित नरदे, संजय कोले यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेच्यावतीने जी. एम. बियाणांच्या समर्थनासाठी हातात फलक घेऊन प्रदर्शन केले.



सांगली : वसुंधरा फेस्टीव्हलमध्ये दीपप्रज्वलन करताना डॉ. बाचुळकर बाजूस अरूण दांडेकर, पापा पाटील, वीरेंद्र चित्राव आदी.